# ''सूर छेडितांना''

**प्रा. सौ. हेमलता जोशी, पुणे**

## "Bowing the Vocal Cords"
## ''बोईंग द व्होकल कॉर्डस्''

(पंडित गजाननबुवा जोशी)

**लेखिका – मानसी जोशी–सिंह**

विल्यम शेक्सपीयरचे एक सुप्रसिद्ध वचन आहे. "If music be the Food of Love, play on!!" किती सुंदर कल्पना आहे. संगीत हे संपूर्ण जीवनाचे मार्ग आहे, स्फूर्ती आहे आणि चैतन्य आहे! म्हणूनच, असे म्हणावेसे वाटते की,

"If music be the Food of Love, play on!!"

संपूर्ण जीवन जर संगीताच्या स्पर्शाने आणि साधनेने उजळून जाणार असेल तर ते संगीत आणि ते सूर सतत वाजत राहू देत! पंडित गजाननबुवा जोशी यांच्या संगीत क्षेत्रातील कार्याची, त्यांच्या साधनेची आणि अष्टपैलू संगीत वादन आणि गायनाची स्फूर्तीदायी, गौरवगाथा गाणारे "Bowing the Vocal Cords" (बोईंग द व्होकल कॉर्डस् (पंडित गजाननबुवा जोशी) हे मानसी जोशी सिंह यांनी लिहिलेले पुस्तक नुकतेच २३ सप्टेंबर २०१२ रोजी ब्लूमिंग्टन (इलिनॉय स्टेट) डॉ. विकास कशाळकर यांच्या हस्ते प्रसिद्ध झाले. संगीत कला आणि संगीत साधना यांचा दर्जा आणि क्षेत्र किती उत्तुंग आहे, विशाल आहे याची अनुभूती हे सुंदर इंग्रजी भाषेत लिहिलेले पुस्तक वाचतांना येत रहाते. पुस्तक हातात घेऊन वाचायला सुरवात केली, आणि थांबूच नये असे वाटायला लागले. ''संगीताच्या एका विशाल प्रवाहात स्वत:ला झोकून दिले. त्या जिवंत चैतन्याच्या प्रवाहात वेगाने पुढे पुढे जात राहिले लेखिका मानसी–जोशी–सिंह यांच्या उत्कृष्ट इंग्रजी भाषेत व्यक्त झालेल्या पंडित गजाननबुवा जोशींच्या अलौकिक कार्याची स्पंदने, आणि

संगीताचे सूर माझ्या मनात, माझ्या हृदयात असंख्य स्पंदने निर्माण करीत राहिले! संगीताच्या एका विशाल सागरात मी स्वत:ला हरवून बसले.

लेखिकाचे इंग्रजी भाषेवर चांगलेच प्रभुत्व असल्याचे जाणवते. त्यांची भाषा संगीताच्या सुरासारखीच मधुर आणि ओघवती आहे. इंग्रजीचा डौल आणि बाज वैशिष्ट्यपूर्ण आहे यात वादच नाही. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचे सूरसम्राट या नात्याने आपल्या गायनातून आणि व्हायोलिन या वाद्यातून सुरांचा स्वर्ग निर्माण करणारे स्वर्गीय पंडित गजाननबुवा जोशी यांच्या जीवनाचे, संगीत साधना, संगीत कार्य आणि शास्त्रीय संगीतातील असमान्य कर्तृत्वाच्या विविध पैलूंचे दर्शन होतांना वाचकाचे मन चक्क मोहरून जाते, भारावून जाते.

हे पुस्तक लिहिण्याच्या मागची लेखिकेची भूमिका आणि त्यांचा दृष्टिकोन मला अतिशय महत्त्वाचा वाटला, ''आदरणीय पंडित गजाननबुवा जोशी यांची जन्मशताब्दी होऊन बराच काळ लोटलेला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांचे उत्तुंग आणि विशाल व्यक्तिमत्व, स्फूर्तीदायी जीवन, संगीत क्षेत्रातील त्यांचे कार्य, कर्तृत्त्व आणि योगदान, तसेच 'गुरू' या नात्याने केलेले ज्ञानदानाचे कार्य यांचे समग्र दर्शन जगाला घडावे – संगीताची साधना करणाऱ्या आणि संगीतावर प्रेम करणाऱ्या सर्व रसिकांना त्यांची प्रगल्भ ओळख व्हावी म्हणून आणि त्यासाठी त्यांना मानाचा मुजरा देण्यासाठी आता योग्य काळ आलेला आहे'' असे त्यांना मनापासून वाटले. पंडित गजाननबुवांसारख्या श्रेष्ठ कलाकाराच्या सृजनशील संगीताच्या प्रवासाचे मर्म त्या सर्वांना समजावे अशी लेखिकाच्या हृदयाच्या गाभ्यापासून निर्माण झालेली ओढ आणि अंत:स्फूर्ती या लेखनाच्या मागे आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, "The goal therefore is to expose a sliver of the artist's creative journey to an aspiring student of music, music lover and the general reader as like!"

खरच पंडित गजाननबुवांच्या श्रेष्ठ गायन आणि वादन कलेचे ठळक वैशिष्ट्य कोणते होते? त्यामध्ये पारंपारिक संगीत कलेचे केवळ अंधानुकरण नव्हते अथवा पूर्णपणे बंडखोर क्रांतिकारक प्रवृत्तीहि नव्हती. या वैशिष्ट्याचे दर्शन घडवतांना लेखिका म्हणते,

"Gajananbuva represents the unique span of an artist who fits neither the mould of a traditionally steeped persona, nor the entire self emerged revolutionary. Instead he is the conglomerate pioneer of the classic bourgeois or middle class of Maharashtrian society who, just as is true of the essence of Indian classical Music played, performed and thrived within the framework inspiring a complete and unique creative identity with the weighty accomplishments of affluent Hindustani classical gayakee of three Gharanas on one hand and the Hindustani classical Violin on th other!!"

''सूर छेडितांना अथवा 'Bowing the Vocal Cords' हे पुस्तक मला स्वत:ला का आवडले? जरा अंत:मुर्ख होऊन विचार केला आणि परिक्षण केले तर असे लक्षात येते की, या पुस्तकाचे अंतरंग, त्यातील आशयाची सखोलता किंबहुना या पुस्तकाचा आत्मा, त्यातील उत्कटता भाषेइतकीच आपल्या मनावर जबरदस्त परिणाम करतात. – हे पुस्तक म्हणजे केवळ गजाननबुवांच्या चरित्र, जीवनाची गाथा नाही तर एका अत्यंत प्रगल्भ कलाकाराच्या प्रगल्भ संगीत कलेचे, आणि व्यक्तिमत्वाच्या बहुविध पैलूंचे सुंदर दर्शन आहे आणि आविष्कार आहे! हे दर्शन जेव्हा होते, तेव्हा एका शुद्ध स्वच्छ, पवित्र आणि दिव्य आनंदाची प्रचिती येते! 'हा आनंद खरच अपूर्व आहे, अनुपम आहे!

या आनंदाचा वाचकांना लाभ देणारी लेखिका स्वत:सुद्धा त्यात सर्वार्थाने आकंठ बुडालेली आहे, रंगून गेलेली आहे. त्यामुळेच 'या हृदयीचे त्या हृदयी घातले' ही अनुभूती देण्याची शक्ति आणि सामर्थ्य तिच्या लेखनास प्राप्त झाले आहे. त्यात अभ्यासूवृत्ती आहे. कौशल्य आहे. हा विषय किती आत्मविश्वासाने आणि तरल पद्धतीने त्यांनी मांडला आहे याचे विलोभनीय आणि मार्मिक दर्शन या पुस्तकात घडते –

पंडित गजाननबुवा जोशी हे या पुस्तकाचे स्फूर्तीस्थान आहेत, नायक आहेत. त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवतांना लेखिकेने जो शोध आणि वेध घेण्याचा अत्यंत प्रामाणिक प्रयत्न केला आहे तो समजून घेणे आणि त्यांचे रसग्रहण करणे हा त्या आनंदोत्सवात सहभागी

होण्याच एक तरल आणि सुंदर अनुभव आहे. स्वर्गीय गजाननबुवा जोशी यांचा जन्म ३० जानेवारी १९११ रोजी अमावास्येला मुंबई, महाराष्ट्र येथे झाला! पण अशुभ मानल्या गेलेल्या अमावस्येला जन्माला आलेल्या अफाट बुद्धिमत्तेच्या गजाननाचे कर्तृत्त्व मात्र ''संगीत क्षेत्रातील जगाला संपूर्णपणे आच्छादून टाकणारा कलाकार, संगीताचा स्वर्ग निर्माण करणारा, नव्या वाटा शोधणारा प्रणेता म्हणून सुवर्णमयी ठरले!''

त्यांच्या जीवनाच्या या वाटचालीत तीन मार्ग ठळकपणे जाणवतात. १) ग्वाल्हेर घराण्याच्या पारंपारिक आणि प्रगल्य शास्त्रीय संगीताच्या पायावर बैठक तयार झालेली असली तरी तेवढ्याच ताकदीच्या जयपूर अत्रोली आणि आग्रा घराण्याच्या शास्त्रीय संगीतावर सुद्धा त्यांनी प्रचंड प्रभुत्त्व मिळवले. अशा फार थोड्या श्रेष्ठ कलाकारांच्यामध्ये त्यांचा समावेश होतो. नव्या विचारांच्या पायवाटा आणि नवी क्षितिजे विस्तृत करण्याची जिद्द आणि हिंमत त्यांनी दाखवली. वडील अंतूबुवा यांच्याकडे ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीचे शिक्षण घेतल्यानंतर पंडित रामकृष्णबुवा यांच्याकडे पण त्या गायकीची क्षितिजे विस्तीर्ण करण्यासाठी मात्र त्यांनी खूप कष्ट घेतले. वडिलांच्या कडक शिस्तीचे पालन करणे असह्य झाल्याने त्यांनी इचलकरंजीला जाऊन बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांकडे शास्त्रीयगायनाचे शिक्षण घेतले, जयपूर–अत्रोली घराण्याची गायकी आत्मसात केल्यानंतर मग ते आग्रा घराण्याच्या गायकीकडे वळले.

औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे गजाननबुवांच्या वडिलांचे आश्रमदाते! ते अतिशय चोखंदळ ज्ञानी आणि उत्तम कीर्तनकार सुद्धा असल्यामुळे बुवांना व्हायोलिनवादनाची संधी मिळाली. व्हायेलिनची कसलीही माहीती नसतांना विविध गीते वाजवतांना त्यांची प्रगती चालूच राहिली. व्हायोलिनकडे त्यांनी वेगळ्या नजरेने कधी पाहिलेच नाही. त्यांना माहित असलेल्या शास्त्रीय संगीताच्या सुरांशी त्या व्हायेलिनचा मेळ घालून त्यांनी शास्त्रीय संगीताचे सूर छेडले 'प्रथम गायचे आणि मग व्हायोलिन वाजवायचे' अशी त्यांच्या रियाजाची पद्धत होती. शास्त्रीय गायन सतत मनात असल्याने व्हायोलिनवर मीण्ड, गमक आणि खटका यांच्यासारख्या परिणामकारक तंत्रकौशल्यविषयी लिहितांना लेखिका म्हणते का, त्यांच्या व्हायोलिन वादनावर 'गाणारे व्हायोलिन' असे शिक्कामोर्तब झाले. जणू काही व्हायोलिनच्या तारा छेडण्याऐवजी ते

गळ्यातील सूर छेडित आहेत असे वाटे. 'As if he was bowing the vocal cords instead of strings of the instrument!'

बुवांचे व्हायेलिन वादन हे अतिशय मधुर, दमदार आणि वजनदार स्वरूपाचे होते. त्यांच्या वादनात ग्वाल्हेर गायकी, जयपूर–अत्रोली गायकी आणि आग्रा गायकीचे अतिशय सुंदर असे प्रभावी मिश्रण असे त्यामुळे त्यांची ओळख बालगंधर्वांप्रमाणे 'व्हायोलिन गंधर्व' अशीच होऊ लागली. वझे यांच्याकडेही ते शिकले तर उस्ताद भुर्जीखान यांच्याकडे जयपूर–अत्रोली घराण्याचे संगीत शिक्षण त्यांनी घेतले. त्यानंतर आग्रा घराण्याचे उस्ताद विलायत हुसेन खान यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण झाले. 'त्रिवेणी संगमच जणू' असे या सर्व शोधाचे आणि प्रयत्नांचे वर्णन करता येईल.

२) त्यानंतर १९२३ मध्ये औंधचे राजेसाहेब यांच्या कीर्तनात संपूर्णपणे अनोळखी असलेल्या व्हायोलिन या वाद्याची ते साथ करू लागले. कोणतेही मार्गदर्शन नसतांना व्हायोलिन वादनावर त्यांनी असमान्य प्रभुत्व आणि कौशल्य प्राप्त केले. ऑल इंडिया रेडिओ, मुंबई येथे Vocal and violin Recitals केल्या.

३) 'विद्या दानी' अथवा गुरू या नात्याने त्यांनी आपले ज्ञान आणि कौशल्य त्यांचे शिष्य आणि अनुयायांपर्यंत पोहोचविले. त्यांना स्वत:ला जरी संगीत साधनेत अत्यंत खडतर तपश्चर्या करावी लागली तरी सर्व प्रकारच्या परिस्थितीला सामोरे जाऊन संगीत शिक्षण घेण्याच्या ओढीने आलेल्या विद्यार्थ्यांवर मात्र त्यांनी उगीचच अटी न घालता मुक्त मनाने आणि प्रसन्नपणे त्यांच्या कौशल्याचा वर्षावच केला. संगीत क्षेत्रात त्या विद्यार्थ्याचे ज्ञान किती आहे. तो कोणत्या घराण्याचा आहे अशा शंका न काढता, तो शिक्षण घेण्याच्या ज्या ओढीने आला आहे ती ओढ, तो उत्साह आणि आतुरता महत्त्वाची समजून त्या विद्यार्थ्याच्या प्रगतीचे मार्ग त्यांनी सुकर केले! त्यांच्या वडिलांचे आध्यात्मिक गुरू ''शिवानंद'' यांच्या नावाने स्वामी शिवानंद ट्रस्ट ही संस्था स्थापन करून औंध येथे संगीत महोत्सव सुरू केला.

वडिलांच्या म्हणजे अंतूबुवांच्या मार्गदर्शनाखाली ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीने बुवांच्या शास्त्रीय गायनाची सुरुवात झाली. त्यात ते खरोखरी आकंठ बुडाले – महाराष्ट्रात ग्वाल्हेर

गायनपद्धती साधी, सरळ अशा हरिदास पद्धतीची होती. परंतु ग्वाल्हेरमधील पद्धत ही अतिशय गुंतागुंतीची आणि अवघड असून त्यावर टप्पा पद्धतीचा प्रभाव जास्त होता. या गायकीच्या चौकटीपलीकडे बुवा फारसे गेले नाहीत. बुवांनी तबला वादनाचेहि कौशल्य प्राप्त केले होते. ते त्यांचे कौशल्य एवढे असामान्य होते की, सुप्रसिद्ध तबलावादन उस्ताद थिरकवा यांनी त्यांना ‘तालिया गवई’ असा मानाचा किताब बहाल करुन त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. गजाननबुवा खऱ्या अर्थाने पूर्णत्वाला गेलेले असामान्य कलाकार होते. त्यांचे गायन आणि वादन दोन्हीही अतिशय मधुर स्वरूपाचे होते. त्यांची तालाची जाण अतिशय परिपक्व आणि प्रगल्भ होती. त्यांच्या या आलौकिक पैलूंचे वर्णन लेखिकेने फार मार्मिकपणे केले आहे. त्या म्हणतात, ‘‘गजाननबुवांची बुद्धिमत्ता जरी त्यांच्या गायनातून प्रतिबिंबित होत असली तरी त्यांचे हृदय मात्र ‘व्हायोलिन वादनातूनच’ प्रतिबिंबित होत असे.’’

लेखिकेने गजाननबुवांचे ‘गुरू’ या नात्याने केलेल्या योगदानाचे फार सुंदर वर्णन केले आहे, ‘‘ते एखाद्या प्रचंड वेगाने कोसळणाऱ्या जलप्रपातासारखे होते. कोणताही भेदभाव न करता संगीत शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे ते बाहू पसरुन खुल्या दिलाने स्वागत करीत असत, मनात आर्थिक लाभाची तर कसलीच अपेक्षा नसे. जणू संगीताचे शिक्षण देण्यासाठीच त्यांचा जन्म झाला होता! ‘गुरू’ या शब्दाचा अर्थ अज्ञानरूपी अंध:काराचा नाश करणारा’ असा आहे. संगीताची पार्श्वभूमी नसणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवण्याची त्यांची पद्धत फार साधी होती. ठेक्यावर लक्ष ठेवणे, तानपुरा वाजवणे अथवा त्यांच्या स्वत:च्या रियाझावर लक्ष केंद्रित करणे यासारख्या गोष्टींचा त्यात समावेश असे. बुवांचा favourite formula म्हणजे 'Learn from association' हा होता. संगीताची साधना चोवीस तास केली पाहिजे – म्हणजे याचा अर्थ ‘‘जेव्हा तुम्ही संगीत शिकता तेव्हा संगीताचाच विचार करा’’. कारण संगीत आपल्यापेक्षा फार महान आहे. आपल्याला वाटते त्यापेक्षाही प्रचंड आहे!’’

ते विद्यार्थ्यांना खूप बंदिशी शिकवित असत आणि त्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमात भाग द्यायला लावीत असत. ते त्यांना त्यांच्याबरोबर गायला लावीत. ते सांगत असत, माझी केवळ माझी कॉपी करू नका. जे तुम्हाला पूरक असेल आणि जेवढे गाता येईल तेवढेच करा अथवा वाजवा. शास्त्रीय

संगीत आणि साधना याबद्दल गुरू यानात्याने बुवांचा दर्जा आणि दृष्टिकोन फार उच्च दर्जाचा होता. त्यांच्या या पैलूंचे वर्णन करतांना लेखिका म्हणते, "Classical music and its Sadhana is not just a skill science. It is a life science. It is the journey and the collective consciousness of society and th path to enlightenment for those unable to experience all that is possible, all that human life is expected to and capable of going through!!

"Bowing the vocal Cords" हे पुस्तक इंग्रजी भाषेत लिहिलेले असल्यामुळे भारतात तसेच परदेशात शास्त्रीय संगीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त ठरणार आहे. या पुस्तकाच्या लेखिक मानसी जोशी-सिंह या स्वत: पुणे विद्यापिठातील कॉम्प्युटर क्षेत्रातील पदवीधर आहेत. गेली बारा वर्षे त्यांचे वास्तव्य अमेरिकेत ब्लूमिंग्टन (इलिनॉय) आणि सध्या 'ऑस्टिन' (टेक्सास) मध्ये आहे. त्या सध्या ऑस्टिन या शहरात AMD (Advanced Micra Devices) या सुप्रसिद्ध कंपनीमध्ये आय. टी. प्रोग्रॅम मॅनेजर म्हणून काम करतात.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताची अत्यंत आवड असल्यामुळे पंडित डॉ. विकास कशाळकर आणि सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायिका श्रीमती आरती अंकलिकर-टिकेकर यांच्याकडे त्यांचे शास्त्रीय संगीताचे शिक्षण चालू आहे. शास्त्रीय संगीताच्या अनेक मैफिलांमध्ये त्यांनी अमेरिका आणि भारतात भाग घेतलेला आहे. अमेरिकेमध्ये इॅलिनॉय स्टेटमध्ये ''इंडियन म्युझिक सोसायटी'' (Indain Music Society) या संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा सह-संस्थापक (Co-Founder) या नात्याने फार महत्त्वाचा वाटा आहे. संगीतकलेला उत्तम दर्जा आणि उत्तेजन देण्याच्या हेतून नवनवीन कलाकरांना उत्तम संधी मिळावी म्हणून या संस्थेतर्फे अनेक कार्यक्रम आयोजित केले जात असतात. भारतातून सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायक आणि वादकांना आमंत्रित केले जाते. साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे पुणे येथे ललित लेखन स्पर्धा झाली होती. त्यांच्या 'गुरू' श्रीमती आरती अंकलिकर टिकेकर यांच्या अमेरिकेतील वास्तव्यात त्यांना जी स्फूर्ती आणि मार्गदर्शन मिळाले त्यावर आधारित लिहिलेल्या 'मिले सूर मेरा तुम्हारा' हा त्यांचा लेख ''सुवासिनी'' (२०११) या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला होता. या लेखाला प्रथम

क्रमांचे पारितोषिक मिळाले होते. त्यांनी अतिशय दर्जेदार स्वरूपाचे डिजिटल वर्क आणि सुंदर वेबसाईटस पण केलेल्या आहेत. आपल्या वडिलांच्या बरोबर ABHI123 हे पुस्तक पण co-writer या नात्याने इंग्रजी भाषेमध्ये लिहिलेले आहे. लेखिकेने आदरणीय पंडित गजाननबुवा जोशींचे जीवनचरित्र फार सुंदर, ओघवत्या आणि मार्मिक पद्धतीने लिहिलेले आहे. इंग्रजी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व आणि कौशल्य संपूर्ण पुस्तक मुळातून वाचतांना अतिशय उत्कटपणे जाणवते. अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या कलाकाराच्या जीवनावर एवढे सुंदर पुस्तक लिहिणे हे खरोखरीच अत्यंत अवघड आहे. इंग्रजी भाषेत ते अतिशय समर्थपणे लिहिणे हे खरोखरीच फार मोठे आव्हान आहे. ते आव्हान स्विकारून पूर्ण करण्यात मानसी–जोशी–सिंह निश्चितच यशस्वी झाल्या आहेत! भविष्यकाळातील त्यांच्या हातून असेच सुंदर लेखन व्हावी अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून त्यांना मनोमन शुभेच्छा देते !

**प्रा. सौ. हेमलता सुधाकर जोशी,**
ए/३, फ्लॅट नं.१०, राजमयूर सोसायटी (२),
पर्सिस्टंट सॉफ्टवेअरच्या मागे,
एरंडवणे, कर्वे रोड, पुणे ४११००४
फोन नं. ०२०–२५४४०५७६
Email : hemasjoshi@hotmail.com